महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक, अकोला यांचे कार्यालय
Phone No.0724/2435500, Fax No. 0724/2445317

क्र.पोअअ/पोकनि/उपहारगृह दरपत्रक/ 747 /2026 अकोला, दि.22.01.2026

22 JAN 2026

## : निवीदा सुचना :

सर्वांना सुचित करण्यात येते की, पोलीस अधीक्षक कार्यालयाचे ईमारतीमध्ये तळमजल्यावर पोलीस उपहारगृहाची व्यवस्था करण्यात आली आहे. सदरचे उपहारगृह हे पोलीस कल्याण निधी मार्फत चालविण्यात येत असुन सदर उपहारगृहचा हयापूर्वीचा करार संपुष्टात आल्याने सदरचे उपहारगृह एक वर्षाकरीता खालील अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर चालविण्याकरीता द्यावयाचे असुन त्याकरीता निवीदा मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती** :-

| | |
|---|---|
| 1 | पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला येथील उपहारगृह चालविण्याबाबतचा करार आदेश निर्गमीत केल्यापासुन 01 वर्षाकरीता राहील. |
| 2 | कंत्राटदार यांनी यापूर्वी किमान 03 वर्ष कॅन्टींग,हॉटेल चालवलेला असणे आवश्यक आहे. |
| 3 | उपहारगृहाचे किमान दरमहा रुपये 20,000/- (अक्षरी - वीस हजार रु. फक्त ) कॅन्टीन भाडे आकारण्यात येणार असुन महिना संपताच 05 तारखेपर्यंत भाडेची रक्कम कार्यालयातील रोखपाल यांचेकडे न चुकता जमा करावी लागेल. |
| 4 | उपहारगृहाकरीता वापरण्यायोग्य पाण्याची व्यवस्था व विद्युत खर्च कार्यालयाकडुन करण्यात येईल. |
| 5 | दरपत्रक स्विकृत होऊन उपहारगृह चालविण्याचे काम मिळाल्यास जे भाडे असेल त्याप्रमाणे 02 महिन्याचे भाडे अग्रीम स्वरुपात डिपॉझीट म्हणुन कार्यालयास जमा करणे बंधनकारक राहील. सदरहु डिपॉझीट रक्कम करार समाप्त झालेनंतर संबंधीत पुरवठादारास परत करण्यात येईल. |
| 6 | पोलीस अधीक्षक कार्यालयातील उपहारगृह हे आपणांस भाडेतत्वावर देण्यात येत असुन सदर उपहारगृहामधील उपलब्ध असलेल्या वस्तु आपणास लेखीस्वरुपात ताब्यात देण्यात येतील. तदनंतर कॅन्टीनचा करार संपताच वस्तु अथवा इतर साहीत्य सुस्थीतीत परत करावे लागेल. वस्तु हया हरविले गेल्यास अथवा नुकसान झाल्यास त्याबाबतची भरपाई आपणास करुन दयावी लागेल. |
| 7 | उपहारगृहात पुरविण्यात येत असलेले चहा, नाश्ता, थाली, कोल्ड्रींक्स असमाधानकारक/ मुदतबाहय कालावधीचे आढळल्यास करार रदद करण्याचे सर्वस्वी अधिकार हे मा.पोलीस अधीक्षक अकोला यांना राहतील. |
| 8 | सदर उपहारगृहाचा दुस-या व्यवसायासाठी उपयोगकरता येणार नाही. यामध्ये फक्त उपहारगृह/हॉटेल व्यवसाय व त्यासंबंधीत वस्तुच ठेवाव्या लागतील इतर आक्षेपार्ह प्रतिबंधित वस्तु/द्रव्य सामुग्री,साहीत्य अथवा स्फोटक पदार्थ ठेवता येणार नाही.असे आढळल्यास पुर्व सुचना न देताकरारसंपुष्टार आणण्यात येईल. |
| 9 | सदर उपगृहामध्ये कार्यालयाचे परवानगीशिवाय कोणताही बदल अथवा बांधकाम करता येणार नाही.तसेच कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| 10 | पोलीस अधीकारी,अमंलदार, कार्यालयीन स्टॉफ व इतर कर्मचांरी यांचेशी व्यवसायासंबंधी देणी-घेणी उधारी याबाबत अथवा इतरकोणतेही कारणावरुन वादविवाद होणार नाही याची उपहारगृह मालकास खबरदारी घ्यावी लागेल. |
| 11 | सदर उपहारगृह हे अधिकारी/कर्मचारी यांचे आरोग्याशी संबंधीत असल्याने कॅन्टीन मध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या जसे चहा, नाश्ता, थाली, कोल्ड्रींक्स इ. वस्तुंचा/मालाचा दर्जा उत्तम राहील तसेच त्यांचे दर हे बाजारपेठेतील दराच्या तुलनेत रास्त ठेवावे लागतील. |
| 12 | उपहारगृहामध्ये कामगार कायदयानुसार बाल कामगार कामावर ठेवता येणार नाही.तसेच किमान वेतन कायदयानुसार संबंधीताना वेतन दिल्या जाईल याची दक्षता घ्यावी व अश्या प्रकरणी वाद उदभवल्यास त्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. |

सायबर पोलीस स्टेशन, अकोला
आवक/जावक ......391......
दिनांक : ...29/01/26......

| | |
|---|---|
| 13 | उपहारगृहामध्ये कोणतीही नैसर्गिक आपत्ती आग,शॉर्टसर्कीट व इतर पासुन हाणी झाल्यास त्याबाबची नुकसान भरपाई कार्यालयाकडुन दिल्या जाणार नाही. |
| 14 | पिण्यासाठी शुध्द पाणी ठेवावे लागेल,वापरण्यात येणा-या किंवा विक्रीस ठेवण्यात आलेल्या पाणी बॉटल्स कालबाहय झालेल्या नसाव्यात. |
| 15 | उपहारगृह मध्ये ठेवण्यात आलेल्या खादयपदार्थाची यादी दरासह फलकावर लावावी. |
| 16 | उपहारगृहातील स्वयंपाकगृहात स्वच्छता पाळणे अनिवार्य राहील. |
| 17 | घाण व ओल्या कच-याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावावी लागेल. |
| 18 | उपहारगृह धारकास कॅन्टीन करार रदद करावयाचा असल्यास कार्यालयास 01 महिन्यापूर्वी तसे कळवावे लागेल. |
| 19 | करारनामा व त्यानुसार अटी व शर्तीहया उपहारगृहास चालकास बंधनकारक राहतील. करारनामा रुपये 100/- चे स्टॅम्पपेपरवर करुन घ्यावा लागेल. |
| 20 | उपहारगृहामध्ये मद्य, तंबाखुजन्य पदार्थ मासाहांरी पदार्थाची विक्री करता येणार नाही. |
| 21 | उपहारगृहातुन पुरविण्यात येत असलेल्या चहा,नास्ता व इतरसाहीत्यामुळे पोलीस अधीकारी व कर्मचांरी यांना विषबाधा झालेबाबत निष्पन्न झाल्यास याबाबत उपहारगृह चालकास जबाबदार धरण्यास येईल. |
| 22 | ज्या निविदा धारक यांनी रु.20,000/- पेक्षा जास्त दर नोंदविले आहेत व नमुद अटी व शर्ती मान्य केल्या आहेत त्यांना सदरचे कंत्राट देणेस प्राधान्य देण्यात येईल. |
| 23 | वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास करारनामा रदद करण्यात येईल. |

तरी पोलीस उपहारगृह चालविण्याची ईच्छा असेल त्यांनी ज्या दराने कंत्राट घेण्यास इच्छुक आहेत त्याबाबतचा एक बंद लिफाफा तसेच दुस-या लिफाफ्यामध्ये आधारकार्ड, पॅनकार्ड, उपहारगृह चालविण्याचे शॉप ॲक्ट लायसन्स ईत्यादी कागदपत्रे असे दोन लिफाफे दि.31.01.2026 पावेतो सायंकाळी 05.00 वा.पर्यंत **पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, अकोला** येथे सादर करावी त्या नंतर प्राप्त होणाऱ्या निवीदांचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**( मा.पो.अ.यांचे मान्यतेने )**

पोलीस अधीक्षक सत्यमेव जयते अकोला

**( प्रमोद उलेमाले )**
**प्र.पोलीस उपअधिक्षक,मुख्यालय**
**अकोला**

**प्रति,**

1. **पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा, अकोला.**
2. **प्रभारी अधिकारी, पो.स्टे.सायबर पो.अ.कार्यालय अकोला.**

2/- प्रभारी अधिकारी, पो.स्टे.सायबर यांनी सदर निविदा सुचना अकोला जिल्हा पोलीस दलाचे संकेत स्थळावर प्रसिध्दी करुन त्याबाबत या कार्यालयास अवगत करावे.